■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २९३ ■ शुक्रवार दि.११ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 293 ■ Friday Dt.11 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीडमध्ये देवस्थानची जमीन शाळेसाठी घेतली, पण पुढे इतरांना विक्री केल्याचा अजब प्रकार उघडकीस!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## शाळेसाठी घेतलेली देवस्थानची जमीन खाजगी व्यक्तीला विकल्याने शिक्षण विभागाच्या भूमिकेवर सवाल?

# मुस्लिम वस्तीचा दाखला देत नागोबा देवालयाची जागा हडप करत विक्री केली?

## जिल्हा प्रशासनाने इतक्या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष का केले? विक्री होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई का केली नाही?

## देवस्थानची जमीन विकणाऱ्यांवर गुन्हा दाखल झालाच पाहिजे, आणि सखोल चौकशी होणे गरजेचे?

### प्रकरण अत्यंत संवेदनशील, प्रशासनाने तत्काळ दखल घेणे गरजेचे, संबंधित जागा सील करण्याची मागणी!


बीड । प्रतिनिधी


बीड जिल्ह्यात रोज नवीन नवीन काहीही प्रकरण समोर येत असून, अनेक प्रकरण देखील असे असतात की जिल्ह्यात नव्हे तर राज्यात खळबळ उडवून टाकतात. अशातच आता बीड शहरात एक प्रकरण समोर आलं आहे ज्यामध्ये नागोबा देवस्थानची जमीन जागा शाळा उभारण्यासाठी खास विकत घेण्यात आली होती. ग्रामस्थांना शिक्षणाची सुविधा मिळावी, मुलांना शिक्षणाची दारे खुली व्हावीत या उद्देशाने ही जमीन शैक्षणिक वापरासाठी घेतली गेली होती. मात्र ही जमीन शिक्षणासाठी न वापरता, ती इतर खासगी व्यक्तींना विकली गेल्याचा प्रकार उघडकीस आल्याची चर्चा रंगू लागली आहे? वादग्रस्त संस्थाचालक सय्यद यांच्याविरुद्ध तीन दिवसांपूर्वीच गुन्हा दाखल झाला असून याच संस्थाचालकांनी खासबाग परिसरात सर्वे नंबर १२३ मध्ये असणारी नागोबा देवस्थानची जमीन शाळेसाठी संस्थेचे नाव वर विकत घेतल्यानंतर इतर व्यक्तींना विकून टाकली आहे अशी चर्चा नागरिकांमध्ये चालू आहे. नागोबा देवस्थानची जागा व मंदिर स्थलांतर करता येत नाही. ज्या पध्दतीने शाळा या जागेवरवरूण त्या जागेवर स्थलांतर केली जाऊ शकते त्याच पध्दतीने नागोबा मंदिर स्थलांतर करण्याचा कट कारस्थान करत नागोबा देवस्थानची जागा विकणारे आणि खरेदी करणारी दोघांनी संगमत करत सबंधित कारस्थान केलं आहे.

या प्रकारामुळे नागरिकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. नागोबा देवस्थानच्या विश्वासाला तडा गेला असून, ज्या उद्देशाने जमीन घेतली नियम धाब्यावर बसवून जमीन व्यावसायिक हेतूने विकली गेल्याने नागरिक संताप व्यक्त केला जात आहे. सदरील प्रकरण अत्यंत संवेदनशील असून प्रशासनाने या प्रकरणात तात्काळ दखल घेऊन सखोल चौकशी करून देवस्थानची जागा अनाधिकृतपणे खरेदी विक्री करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी आता जोर धरून लागली आहे. तसेच संबंधित जागेवर बांधण्यात आलेली अनाधिकृत शाळेला सील ठोकण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. नागोबा देवस्थानची जमीनजागा, तीही शाळेसारख्या पवित्र हेतूसाठी दिली गेली असताना, तिचा गैरवापर होत आहे अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन नागोबा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सचिव खरेदी विक्री करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल केला जावा अशी चर्चा सुरू झाली आहे. नागोबा मदीर पुन्हा एकदा त्याच ठिकाणी व्हावं अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

या प्रकरणात अधिक माहिती अशी की, बीड शहरातील कागदी वेस परिसरात सर्वे नंबर १२३ तरफ पिंगळे मध्ये श्री नागोबा देवालय ची मंदिर ची जागा होती. सदरील जागा श्री नागोबा देवालय संस्थेच्या नावावर होती. या संस्थेच्या नोंदणी क्रमांक - ए९३०/बीड/२५-३-६३ असा आहे. सदरील जागा ५० बाय ५० ची असून, या जागेवर नागोबा देवालय म्हणजे मंदिर होत. २००९ साली देवस्थानचे ट्रस्टी यांनी बीड शहरातील मोगल मल्टीपर्सस युथ फाऊंडेशन असोसिएशन खासबाग बीड यांना सदरील जागा विकून टाकली आणि इतिहासात कधीही न घडणारी घटना घडवून आणण्याचे काम केले. थेट नागोबा मंदिर खासबाग येथून कबाड गल्लीत स्थलांतरित केल्याचे दाखवण्याचे काम भूमाफीया कडून करण्यात आले आहे ही जागा इतर

पान २ वर




## गेवराई तहसीलने भंगारचा पारदर्शक लिलाव करून शासनाला मिळून दिला ३९ लाखाचा महसूल

गेवराई । प्रतिनिधी

अँड उध्दव रासकर पंधरा वर्षापासून चे जमा भंगार तहसील कार्यालयात साठून तहसील कार्यालयास ओंगळ स्वरूप प्राप्त झाले होते. तहसीलदार यांनी वाहन धारकांना वारंवार दंडाची रक्कम जमा करून वाहने नेण्यासाठी पत्रव्यवहार केला होता, परंतू फक्त चार वाहन धारकांनी दंडाची रक्कम जमा करून वाहने ताब्यात घेतली. पेपर मध्ये जाहीर उद्घोषणा करून उर्वरित ४१ वाहने लिलाव प्रक्रियेत घेऊन त्यासाठी एकूण १८ लोकांनी लिलाव प्रक्रियेत सहभागी होऊन वाहनांवर बोली लावली. सर्व वाहने



आरटीओ कडून किंमत निश्चित करण्यात आली होती, ती किंमत २७ लाखाच्या घरात असताना लिलावात सर्वोच्च बोलीने ३९ लाखांहून अधिक किंमत मिळाली. सदरची प्रक्रिया पूर्ण पारदर्शक रित्या पूर्ण पडून सदर प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या कोणीही हरकत नोंदविली नाही.

सदरची प्रक्रिया शासनाच्या १०० दिवसाच्या कार्यक्रमात दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात आली आहे. तहसीलदार गेवराई यांनी पंधरा वर्षापासून तहसील कार्यालयात अडचण करणाऱ्या वाहनाची जाहीर लिलाव करून शासनाला तब्बल ३९ लाखाचा महसूल मिळून दिला आहे. त्यामुळे तहसीलदार गेवराई यांचे भाजपाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे अशी प्रतिक्रिया अँड उध्दव रासकर यांनी माध्यमांशी बोलताना केली आहे.

## माजलगाव शहरात चिडीमार पथकाची स्थापना करा

माजलगाव । प्रतिनिधी



माजलगाव शहरातील कॉलेज, शाळा परिसरात चिडीमारांनी कळस गाठला असून, महाविद्यालयीन, शाळकरी मुलींची छेड काढण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे. शाळा, महाविद्यालये तसेच खासगी शिकवणी वर्गांच्या परिसरात दिवसा ढवळ्या मुलींची छेड काढल्या जात असल्याने अखेर सर्वसामान्य नागरिकांनी टवाळखोर व चिडीमारांचा बंदोबस्त करण्याची मागणी लावून धरली आहे. भविष्यातील अनुचित प्रकार टाळण्यासाठी मेन रोडवरील शाळा महाविद्यालय कॉलेज जवळ मागील काही दिवसांपासून महाविद्यालय परिसरालगत चिडीमार व टवाळखोर युवकांनी अक्षरश: हैदोस घातला आहे. महाविद्यालयीन तसेच शाळकरी मुलींची दिवसा ढवळ्या छेड काढणे, प्रकार होत आहे. चिडीमार पथक पोलीस निरीक्षक यांनी माजलगाव शहरात पथक स्थापना करून मुलींची छेड काढणाऱ्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी जनतेतून होत आहे.

## लोकनेत्या पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा..!

### शंकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश लांडे यांचा स्तुत्य उपक्रम..!

बीड । प्रतिनिधी

लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे साहेबांचा जनसेवेचा वारसा अविरतपणे चालू ठेणाऱ्या राज्याच्या पशू संवर्धनमंत्री, लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या दिनांक २६ जुलै रोजी वाढदिवस राज्यभर सामाजिक उपक्रमांद्वारे मोठ्या प्रमाणात साजरा होत आहे..

भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरभाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बऱ्हाणपूरचे उपसरपंच, युवा नेते गणेश लांडे यांनी वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांद्वारे सेवा पंधरवाडा साजरा करण्याचे आयोजन केले आहे. यामध्ये श्री क्षेत्र चाकरवाडी, श्री क्षेत्र नारायण गड, इन्फ्रंट इंडिया पाली, यासह अनेक ग्रामपंचायतीमध्ये शालेय साहित्य, वृक्ष लागवड, अनाथ मुलांना खाऊ वाटप, रक्तान शिबिर, रुग्णांना फळे वाटप यासह विविध कार्यक्रम करण्यात येणार आहे.

पान २ वर



## वेलडन पि आय अशोक मुदीराज

### पेठ बीड पोलीसांची कामगिरी रशीद मोग्याच्या क्लबवर कारवाई

बीड । प्रतिनिधी

पोलीस ठाणे पेठ बीड येथे हजर असतांना, गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, इसम नामे १) रशिद ऊर्फ मोग्या आब्दुल रज्जाक रा. गांधीनगर २) शेख शेरु रा.इस्लामपुरा पेठ बीड हे काही इसमांना सोबत घेवुन अलकबीर फंक्शन च्या पाठीमाघे बंद लाकडी मशीन येथे मोकळ्या जागेत बल्बच्या उजेडात काही लोकांना घेवुन तिरट नावाचा जुगार खेळत व खेळवीत आहे.



खात्रीलायक बातमी मिळाले वरुन आम्ही स्वत: पोलीस निरीक्षक, अशोक मुदिराज, सोबत सपोनि. प्रितमकुमार पुजारी, सफौ/१३६महादेव पवार, पोह/१८०३ नितीन राठोड, पोह/१६१३ रमेश भोले, पोह/१०६५ नितीश माने, पोशि/२१४६ शिवाजी राख, पोशि/२०५३ दिपक भोजे, पोशि/२११३ शरद भारती यांना घेवनु मिळालेल्या बातमीचे ठिकाणी २२.३० वा. छापा मारला असता सदर ठिकाणी इसम नामे १) सचिन वसंत जधव वय ४५ वर्षे रा. गांधीनगर पेठ बीड २) मोहम्मद कुतुबुद्दीन शेख वय ५३ वर्ष रा.तेलगाव नाका बीड ३) जुनेदोद्दीन हामिदोद्दीन इनामदार वय २७ वर्ष रा. गांधीनगर पेठ बीड ४) शेख रहीम शेख तय्यब वय ३४ वर्षे रा. इस्लामपुरा पेठ बीड ५) सहीद खान रहीम खान पठाण वय ४० वर्ष रा. गांधीनगर पेठ बीड ६) विक्रांत चंद्रकांत गायकवाड वय २६ वर्ष रा. गांधीनगर पेठ बीड ७) सय्यद इस्माईल सय्यद जाफर वय ५५ वर्ष रा. शंहन्शाह नगर पेठ बीड ८) शेख सलीम शेख हबीब वय ५५ वर्ष रा. शंहन्शाह नगर पेठ बीड ९) ज्ञानेश्वर आश्रुबा गायकवाड वय ४९ वर्ष रा. गांधीनगर पेठ बीड हे मिळुण आले त्यांचे अगझडतील जगाराचे साहित्य पत्ते सह नगदी रक्कम ३३१५०/- रु., आठ मोबाईल कि.८८५००/- रु., दोन मोटार सायकल व एक स्कुटी कि. १३७०००/- रु. असा एकुण २५८६५०/- रु. मुद्देमला जप्त करण्यात आला.

सदर छापा बाबत सरकार तर्फे

पान २ वर

# रोहयोची ओरड; गवतेंनी घेतली अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक

## बीड पंचायत समितीत सरपंचांची गर्दी, ७ हजार मस्टरचे पैसे तातडीने सोडण्याचे बीडीओंचे आश्वासन

बीड । प्रतिनिधी

बीड पंचायत समितीमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेबाबत तक्रारी वाढत असून मस्टर ऑनलाईन करूनही पैसे मिळत नसल्याच्या तक्रारी बीड मतदारसंघातील नागरिकांनी राष्ट्रवादीचे युवानेते तथा पंचायत समितीचे माजी सभापती यांच्याकडे केल्या होत्या. यानंतर दि.१० जुलै रोजी सभापती गवते यांनी बीड पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी कांबळे आणि कर्मचाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली. यावेळी दोन दिवसात रोहयाचा निधी वितरीत करण्याचे आश्वासन गटविकास अधिकारी कांबळे यांनी दिले.




बीड पंचायत समितीमध्ये मागील काही दिवसांपासून रोजगार हमी योजनेसह विविध विकास कामे वेळेत होत नसल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. मागील पंधरा दिवसांपुर्वीच मतदारसंघातील सरपंचांकडून येणाऱ्या जाणून घेत पंचायत समितीचे माजी सभापती बळीराम गवते यांनी गटविकास अधिकारी यांना निवेदन देऊन चर्चा केली होती. यानंतरही रोहयोचे पैसे वेळेत जाण नसल्याचे समोर येऊ लागल्याने दि.१० जुलै रोजी गटविकास अधिकारी कांबळे यांच्या समवेत पंचायत समिती येथे अधिकारी–कर्मचारी यांची संयुक्त बैठक बोलावण्यात आली होती. बैठकीत रोजगार हमी योजनेमधील प्रलंबित असलेले ७००० मस्टरच्या निधीचे वितरण तातडीने व्हावे, असे म्हटले. यावेळी सर्व मस्टरबाबतीतील निधी वितरीत दोन दिवसात होईल, असा शब्द गटविकास अधिकारी कांबळे यांनी दिला. याच बरोबर घरकुलांची मंजुरी करणे, मंजूर झालेल्या घरकुलांचा पहिला हप्ता सोडणे, हेही विषय उपस्थित करण्यात आले. दरम्यान, लाभार्थ्यांच्या प्रश्नाबरोबरच रोजगार सेवकांच्या मानधनाचा प्रश्न देखील त्यांनी यावेळी उपस्थित केला. यावेळी पंचायत समितीमधील कर्मचारी, अधिकारी यांना येणाऱ्या अडचणी देखील जाणून घेत आपण राष्ट्रवादीच्या जेष्ठ नेत्यांकडे अडचणी मांडून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करू, असा विश्वासही यावेळी कर्मचाऱ्यांना दिला. यावेळी बीड मतदारसंघातून आलेले सरपंच, उपसरपंच, ग्रामरोजगार सेवक संघटना, नागरिकांची उपस्थिती होती.

## ना. गो. नांदापूरकर यांच्या 'मायबोलीची कहाणी' ग्रंथाचे आज पुनर्प्रकाशन

बीड । प्रतिनिधी

सुप्रसिद्ध दिवंगत कवी व लेखक ना. गो. नांदापूरकर यांच्या मायबोलीची कहाणी या महत्त्वपूर्ण ग्रंथाच्या पुनर्प्रकाशन सोहळ्याचे आयोजन शनिवारी, १२ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता शहरातील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (काकू) कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात करण्यात आले आहे.




या ग्रंथाचे पहिले प्रकाशन १९४७ मध्ये झाले होते. वाचकांसाठी हा मौल्यवान ग्रंथ पुन्हा उपलब्ध व्हावा यासाठी मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगर या संस्थेने या ग्रंथाचे पुनर्प्रकाशन केले आहे. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. विद्यासागर पाटंगणकर उपस्थित राहणार आहेत. तर मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, कार्यवाह दादा गोरे, उपाध्यक्ष आसाराम लोमटे, कोषाध्यक्ष रामचंद्र काळुंखे, सहकार्यवाह डॉ. दीपा क्षीरसागर, डॉ. गणेश मोहिते, मसाप बीड शाखेचे अध्यक्ष डॉ. सतीश साळुंखे यांची उपस्थिती राहणार आहे. वाचक, अभ्यासक व संशोधक यांनी या प्रकाशन सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



## ब्राईटस्टार इंग्लिश शाळेत विठ्ठल नामाचा गजर लेझीम पथकासह पायी दिंडीची उत्सहात मिरवणूक

परतूर । प्रतिनिधी

परतूर येथील ब्राईट स्टार इंग्लिश शाळेत देवशयनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्माई तसेच वारकऱ्यांची वेश परिधान करून शाळेपासून दिंडीची सुरुवात करण्यात आली. मा.आमदार सुरेशकुमार जेथलिया व त्यांच्या पत्नी मा. नगराध्यक्ष विमलताई जेथलिया यांनी विठ्ठलाच्या पालखीचे पूजन केले.

त्यानंतर दिंडी मोंढा भागातून बालाजी मंदिराला भेट दिली. त्यानंतर मुख्य रस्त्यावर दिंडीसाठी गेहलोत परिवाराने सर्व वारकऱ्यांना शरबत वाटप केले व पालखीची पूजा केली, त्यानंतर पालखी महादेव चौकातील मंदिरात गेली, याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी लेझीम चे पथक टाळ मृदंग वाजवत दिंडी पूर्ण केली. याप्रसंगी शाळेच्या संचालिका श्रीमती योगिता मनवर ,शाळेचे मुख्याध्यापक गणेश शिंदे ,सर्व सहशिक्षक श्रीमती शिंदे मॅडम, श्री पवार सर, श्री डावखर सर, डावखर मॅडम, कार्तिका ताजी मॅडम, पूजा मॅडम, आरती मॅडम, ज्योती मॅडम, मोरे मॅडम, लक्ष्मीबाई, साठे मामा नंदू इत्यादींनी परिश्रम घेतले.

## ९ गहाळ मोबाईल नागरीकांना परत

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

संभाजीनगर पोलीसांनी वेगवेगळ्या कंपनीचे गहाळ झालेल्या ९ मोबाईलचा शोध घेवुन तक्रारदार नागरीकांना परत केले.

संभाजीनगर पोलीस ठाण्यात नागरीकांचे मोबाईल गहाळ झाले बाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी पो.नि.धनंजय ढोणे यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रीक विश्लेषणाद्वारे पोअं. खाडे यांनी शोध घेतल्यानंतर वेगवेगळ्या कंपनीचे एक लाख रुपये किंमतीचे गहाळ मोबाईल अभिजीत धोंडीराम मुंडे रा.साकुड, लक्ष्मण दडगे रा. बजरंगनगर परळी, रविंद्र बनसोडे रा. लिंबुटा, अमोल गर्जे रा. टी. पी.एस. कॉलनी लातुर, अमोल कुलकर्णी रा. हेळम, सुदाम खाडे रा. होळ, जिवन सुरवसे रा.परचुंडी, नितीन डापकर रा.बेलंबा, रोहित स्वामी रा. विद्यानगर या तक्रारदार नागरीकांना परत केले. पोउपनि जाधव, शिंदे, व्यंकटी खाडे, शंकर डोंगळे, विक्की सुरवसे यांनी केली.

पान १ वरून...

### जिल्हा प्रशासनाने इतक्या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष का केले?

कोणी नव्हे तर संस्थाचालक सईद बेग यांनी विकत घेत आपल्या शाळेकरिता नागोबा मंदिराची विटंबना केल्याचे समोर आले आहे. नागोबा मंदिराची जागा विकत घेतल्यानंतर या ठिकाणी सईद बेग यांनी आपल्या शाळेच्या बांधकामासाठी जुने नागोबा देवालय चे कपिऊड तोडून टाकले या ठिकाणी असलेले नागोबा मंदिर चे पवित्र संपुष्टात आगल्याचे चित्र समोर आले आहे. नागोबा देवालयाची सदरची जागा सर्वे नंबर १२३ मध्ये असून याचा पीआर कार्ड क्रमांक ९००६ आहे तर नगरपरिषद मिडकेत क्रमांक जुना एक १०–१०– २००९ तर नवीन एक ०१–१०–२३० आहे. आश्चर्याची बाब म्हणजे, नागोबा देवस्थानची जागा हे स्थलांतर होत नाही. तरीपण घेणारे आणि देणारे दोघांनी षडयंत्र करून स्वतःच्या लाभापोटी नागोबा देवस्थानच्या जागेचा अवमान केल्याचे समोर आले आहे. वादग्रस्त संस्था चालक सईद बेग यांनी या ठिकाणी आपल्या संस्थे मोगल मल्टीपर्पस युथ असोसिएशनचे नाव याच ठिकाणी शाळा मंजूर करून घेण्यात आल्याचे सुद्धा समोर आले आहे. ज्या ठिकाणी मंदिर होतं त्या ठिकाणी सईद बेग यांचे वादग्रस्त अन्वर बेग उर्दू प्राथमिक शाळा २०१० व २०११ या वर्षात सुरू होती. अनेक पुरावे असून शाळेसाठी जागा विकत घेऊन नंतर सईद बेग यांनी ही जागा आपल्या नातेवाईकाला विकण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे बीड संघर्ष या दैनिकाने संबंधित प्रकरणात आवाज उठवला असता संपादक उमर खान यांना याच संस्थाचालकाकडून मारहाण माहिती समोर आली आहे. १५० पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे तर नागोबा मंदिराच्या जागेवर सध्या मोठे घर बांधण्यात आले असून हे घर अनाधिकृत आणि भक्तांचे अवमान करणारे आहे. सदरील प्रकरणा अत्यंत संवेदनशील आहे याचे पुरावे असून प्रशासनाने या प्रकरणात तात्काळ दखल घेऊन या प्रकरणाची चौकशी करून नागोबा देवस्थानची जागा विकणारे आणि गजराजी बाबू काळे व खरेदी करणारे वादग्रस्त चालक मिर्झा अश्फफ सईद बेग यांच्या विरोधात गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात हे प्रकरण बीड जिल्ह्यातील शाततेला हादरा देणारे ठरू शकते. अशी चर्चा बीड शहरांमध्ये नागरिकत चालू आहेत?

वादग्रस्त संस्थाचालक व सईद बेग यांनी नागोबा देवालयाची जागा विकत घेऊन त्या ठिकाणी २०१० आणि ११ मध्ये शाळा चालविण्याची काम केले होते. आश्चर्याची बाब म्हणजे सदरील जागा ५० बाय ५० ची असून याचा करारनाम्यात सुद्धा उल्लेख आहे. असे असताना देखील ५० बाय ५० च्या जागेत शाळा चालविण्याचे अधिकार वादग्रस्त संस्थाचालकाला कोणी दिला याचा शोध घेणे गरजेचे आहे. या प्रकरणात शिक्षण विभागाची भूमिका संशयास्पद दिसून येत आहे. शैक्षणिक वर्षात शिक्षण विभागाकडून विस्ताराधिकारी ते इतर अनेक अधिकारी तपासणीसाठी शाळेला भेट देतात. त्यांना हे प्रकरण दिसून आले नाही किंवा दिसून आले तरी त्यांनी डोळेझाक केले असल्याचे चित्र स्पष्ट दिसून येत आहे. २०१० आणि २०११ मध्ये शिक्षण विभागातील ज्या ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या शाळेला भेट दिली आहे त्यांची देखील चौकशी होणे गरजेचे आहे. तरी मुस्लिम समाजाच्या वसतीचा दाखला दाखवून काळे व बेग या खरेदी विक्री करणाऱ्या व्यक्तीनी दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. याच्या विरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे. तरी बीड जिल्हा प्रशासन काय कारवाई करणार याकडे अनेकांच्या नजरा लागल्या आहेत.

### लोकनेत्या पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवाडा..!

आज या उपक्रमाचा शुभारंभ भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, मंडळ अध्यक्ष मनोज पाटील यांच्या शुभहस्ते उमरद खा. येथे शालेय साहित्य वाटप करून व वृक्षारोपण करून झाला. यावेळी नरेश पवार, महादेव नागरगोजे, सरपंच गणेश घोडे, सरपंच गोरख शिंदे. शिवदास क्षीरसागर, सचिन जाधव, गणेश जाधव, विक्रम परसकर, सुभास गिराम, गोरक्षनाथ लांडे, जनार्दन लांडे, काशिनाथ लांडे, बाळनाथ लांडे, कैलास लांडे, मच्छिंद्र शिरसागर, दत्ता जाधव, सिद्धेश्वर परसकर, महारुद्र सोनवणे, दत्ता प्रभाळे, नागुराव जाधव, माऊली परसकर यांच्या ग्रामस्थ, शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वेलडन पि आय अशोक मुदीराज

फिर्यादी नामे महादेव निवृत्ती पवार वय ५६ वर्ष व्यवसाय नौकरी सफौ/१३६ नेमणुक पोलीस ठाणे पेठ बीड यांनी दिलेल्या फिर्याद वरुन एकुण ११ इसमान विरुध्द नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन या बाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक, श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री. कमलेश मीना यांना माहीती देवुन मा. वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कार्यवाही केली असुन पुढील तपास पोह/१५०८ अनिल भालेराव हे करीत आहेत.

## पत्रकार सुनिल सिरसाट जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कै.चंदू दादू भोसले स्मृती आरोग्य प्रतिष्ठान पुणे आणि दलित पँथर संघटनेच्या वतीने राज्यातील विविध क्षेत्रातील विविध मान्यवरांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यात अंबाजोगाई येथील सुनील सिरसाट यांना पत्रकारिता क्षेत्रातील सामाजिक कार्याबद्दल जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकारिता क्षेत्रात काम करत असलेले सुनील सिरसाट हे मुळात भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते आहेत. गोरगरीब–सर्वसामान्य आणि पिडीतांसाठी ते सातत्याने कार्यरत असतात.



सामाजिक कार्य करताना ते विविध शासकीय कार्यालयातील थकलेल्या कामाचा अतिशय कौशल्याने निपटारा करुन हाती घेतलेले काम तडीस नेले आहे. तसेच ते निर्भीड पत्रकार म्हणूनही बीड जिल्ह्यात परिचित आहेत.भाजपाचे मराठवाडा विभागावरील पदाधिकारी असुन ईतरही अनेक संघटनांचे ते पदाधिकारी आहेत. त्यांच्या सर्वच स्तरातील कार्याची नोंद घेऊन पुणे येथील कै.चंदू दादू भोसले स्मृती आरोग्य प्रतिष्ठान आणि दलित पँथर संघटनेच्या त्रेपन्नाव्या वर्धापन दिनानिमित्त जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकारिता क्षेत्रातील भरीव–उल्लेखनीय कार्याबद्दलचा सिरसाट यांचा तिसरा पुरस्कार असल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

## पत्रकार चंद्रकांत पाटील यांच्या घरी ब्रम्हकमळ फुलले, केली विधीवत पुजा

केज । प्रतिनिधी

केज शहरातील पत्रकार चंद्रकांत पाटील यांच्या निवासस्थानी ब्रम्ह कमळ फुलले असुन त्याला दोन फुले आली होती. यावेळी चंद्रकांत पाटील व सौ.ज्योती पाटील यांनी तसेच दिगांबर जगताप व वर्षाताई जगताप यांनी विधीवत पूजन करून ब्रम्हकमळ देवाला अर्पण केले. ब्रम्ह कमळ हे रात्रीच्या वेळी उमलते त्यामुळे ब्रम्ह कमळाला फुले येण्याची प्रतीक्षा महिलांना असते.

त्यामुळे ब्रम्ह कमळाला फुले आल्याचा आनंद महिला वर्गाला होतो. वर्षभरात केलेली जोपासना फळाला आल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येतो. त्यामुळे ब्रम्ह कमळाला कळी आल्यावर फुले येण्याची प्रतीक्षा महिलांना असते. विधीवत पुजन करून हे ब्रम्ह कमळ देवाला अर्पण केले जाते.





## अंबाजोगाई शहरातील युवकांचा काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात काँग्रेस पक्षाची २५ वर्षांपासून एकहाती सत्ता आहे. मागिल काळात जवळपास सर्वच नेते काँग्रेस सोडून सत्ताधारी पक्षात गेल्याने अंबाजोगाई शहर व तालुक्यातून काँग्रेस संपली असे इतर पक्षातील नेते मंडळी म्हणत असतानाच शिवसंग्रामचे युवक जिल्हाध्यक्ष तथा डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांना शहराध्यक्ष असेफोद्दीन बाबा खतीब यांनी काँग्रेस मध्ये आणत माजी मंत्री अशोकराव पाटील व जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी अभिजीत लोमटे यांच्यावर तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. शहराध्यक्ष पदी असेफोद्दीन खतीब यांची निवड करताच ही जोडगोळी कामाला लागली असून काँग्रेस पक्षात अंबाजोगाईतील प्रसिद्ध व्यापारी रावसाहेब घाडगे पाटील, युवा नेते इरफान कुरेशी, शेख समद, सय्यद सलमान, सोहेल खान, अँड अजमेर शेख, ऍड सलीम शेख, मोबीन शेख, नियामत शेख यांच्यासह असंख्य युवकांनी माजी मंत्री अशोकराव दादा पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, युवा नेते आदित्य पाटील, तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे, शहराध्यक्ष असेफोड्डीन खतीब यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला असून काँग्रेस पक्षास आलेली मरगळ लोमटे व खतीब यांची जोडगोळी दूर करतील अशी चर्चा होताना दिसत आहे.

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत फळबाग व बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावेत : कैलास कावरे

सिरसाळा । प्रतिनिधी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत कृषी विभागामार्फत आंबा, काजू, नारळ, सुपारी, फणस, कोकम, चिकू इत्यादी फळपिकांची तसेच बांबू लागवड करता येते. यासाठी १०० टक्के अनुदान उपलब्ध आहे. योजनेच्या अधिक माहितीसाठी सहायक कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन शिवसेना नेते तथा सर्कलप्रमुख कैलास कावरे यांनी केले आहे.

पुढे प्रसिद्धी पत्रकार कैलास कावरे यांनी म्हटले आहे की कृषी मंत्री कृषी विभाग महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब शेतकऱ्यांसाठी चांगले उपक्रम राबविण्यासाठी कटिबद्ध आहेत शिवसेनेचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ज्या शिरसाळा शिवसेना नेहमीच शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्यरत असून ज्या शेतकऱ्यांना आवश्यकता आहे किंवा या योजनेचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी संबंधित कृषी अधिकारी यांच्याशी कागदपत्रा सहित भेट घेऊन संपर्क साधावा ज्या शेतकऱ्यांना काही अडचण काय तक्रार असल्यास त्यांनी सिरसाळा शहर शिवसेनेशी संपर्क साधावा असे आवाहन शिवसेना नेते सर्कल प्रमुख कैलास कावरे यांनी केले आहे



जिल्ह्यातील हवामान फळबाग व बांबू लागवडीसाठी पोषक व अनुकूल आहे. शेतीमधून शाश्वत स्वरूपाचे उत्पादन मिळविण्यासाठी शेतकरी बांधवानी फळबाग लागवडीकडे वळणे आवश्यक आहे. जून व जुलै महिना हा फळबाग लागवडीसाठी योग्य कालावधी आहे. जून मध्ये लागवड केलेल्या कलमांची वाढ जोमदार होते. त्यामुळे शेतकरी बांधवांनी जून महिन्यामध्ये फळपिकाची व बांबूची लागवड करण्याचा प्रयत्न करावा. फळबाग लागवड करताना शक्यतो सीआरए तंत्रज्ञानाचा वापर करावा. सीआरए तंत्रज्ञानाबाबत संबंधित गावातील सहाय्यक कृषी अधिकारी मार्गदर्शन करतील.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत शेतकरी बांधवांना ५ गुंठे ते २ हेक्टर क्षेत्रापर्यंत फळबाग लागवड करता येते. यामध्ये प्रथम वर्षी ५० टक्के द्वितीय वर्षी ३० टक्के व तृतीय वर्षी २० टक्के याप्रमाणे अनुदान वितरीत केले जाते. अल्पभूधारक म्हणजे २ हेक्टर व त्यापेक्षा कमी जमीनधारणा असलेले शेतकरी लाभ घेऊ शकतात. अनूसुचित जाती व अनूसुचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना जमीनधारणेची अट नाही. इच्छुक शेतकरी बांधवांकडे रोजगार हमी योजनेचे जॉब कार्ड असणे आवश्यक आहे.

आवश्यक कागदपत्रे– अर्ज व त्यासोबत सातबारा उतारा, ८ अ उतारा, आधारकार्ड, बँक पासबुक, जॉब कार्ड, संमतीपत्र, ग्रामसभा ठराव इत्यादी कागदपत्रे ग्रामस्तरीय सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावेत. फळपिके व अनुदान देय रक्कम– आंबा फळपिकासाठी (१०द१०) मीटर अनुदान देय रक्कम २ लाख ५ पाच हजार ५१२ रुपये, आंबा (५द५) मीटर अनुदान देय रक्कम २ लाख ६५ हजार ८५० रुपये, काजू १ लाख ४४ हजार ३२ रुपये, नारळ रोपे (बाणवली) १ लाख ६७ हजार ८६६ रुपये, सुपारी २ लाख ६३ हजार ७४० रुपये, बांबू ७ लाख ४ हजार ४४६ रुपये.शेतकरयानी आर्ज करण्यात यावे.

## जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या गाभाऱ्यास विड्याच्या पानांची सजावट

### श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील प्रतिदेहु श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरुपौर्णिमा हजारो भाविकांच्या उपस्थिती त मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. गुरूवर्य महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शना खाली गुरूपोर्णिमेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा गाभारा हजारो विड्याच्या पानांनी सजवण्यात आला.

संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरु पौर्णिमेनिमित्त आलेल्या भक्तांनी संत तुकाराम महाराजांच्या दर्शना बरोबरच गुरूवर्य महंत ह.भ.प.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे आशीर्वाद ही घेतले. याप्रसंगी महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांची किर्तनसेवा संपन्न झाली. पावनधाम



येथे आलेल्या हजारो भाविकांच्या प्रसादाची व्यवस्था सौ.स्मिता चंद्रकांत लोमटे यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल महाराज, अशोक महाराज, जनार्धन महाराज, सिरसट महाराज, प्रशांत महाराज निगडे, गणेश महाराज भगत, शाम महाराज भिसे, गोविंद शिनगारे आणि सर्व स्वयंसेवकांनी प्रयत्न केले. गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# १८५ दिवसात तब्बल १३० शेतकरी आत्महत्या; चौकशीसह मदतीलाही विलंब

## वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री अजितदादांना बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या मदतीचे नियोजनात अपयशी

बीड । प्रतिनिधी

पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या बीड अवकाळी पाऊस, नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा या प्रमुख कारणांमुळे मनोधैर्य खचलेल्या शेतकऱ्यांनी जिल्ह्यात गेल्या १ जानेवारी २०२५ ते १४ जुलै २०२५ या १८५ दिवसात तब्बल १३० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यापैकी ९३ प्रकरणे पात्र ठरली आहेत तर १९ प्रकरणे मदतीस अपात्र ठरविण्यात आली असुन १८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे यात पात्र अपात्रतेचा घोळ सुरूच असुन फेब्रुवारी, मे, जुन या महिन्यांतील प्रकरणांचा चौकशी अहवाल अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना मदतीचे नियोजन जमेना असे म्हणण्याची वेळ आली आहे.आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना तातडीने शासकीय मदतीसाठी निधी उपलब्ध करून देऊन कुटुंबाची परवड थांबवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.





अवकाळी पाऊस,नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा या प्रमुख कारणांमुळे मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते. बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन शासनामार्फत दिली जाणारी मदत वेळेवर मिळणे बंधनकारक असतानाही महिनोंमहिने शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जात नसल्याने कुटुंबाची परवड होत आहे.

**जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे महिन्यातुन २ वेळा बैठक आणि महिनाभरात आर्थिक मदतीचे आश्वासन हवेतच विरले**

दि.२८ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वत: शेतकरी आत्महत्यांचे प्रकरण मार्गी लावण्यासाठी महिन्यातून २ बैठका घेणार असल्याचे तसेच तालुका स्तरावरून तहसीलदारांना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे प्रस्ताव १५ दिवसात जिल्हा समितीकडे पाठवण्याचे याबरोबरच जिल्हास्तरीय समितीने पात्र केलेल्या कुटुंबियांना शासकीय मदत देण्याची प्रक्रिया पुढील १५ दिवसांत पूर्ण केली जाणार असुन महिनाभरात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणार असल्याची माहिती दिली होती. मात्र हे आश्वासन हवेतच विरल्याचे दिसुन येते. कारण आजही १८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असुन जुलै महिना अर्धा होत असताना फेब्रुवारी आणि मार्च महिन्यातील प्रत्येकी १ तसेच मे महिन्यातील २ जुन महिन्यातील १० आणि जुलै महिन्यातील ४ प्रकरणांचे अहवाल प्रलंबित आहेत. मदतीसाठी सुद्धा अशीच दिरंगाई सुरू असुन मे महिन्यातील २ जुन महिन्यातील ७ आणि चालु महिन्यातील ४ प्रकरणे आजही मदतीसाठी प्रलंबित आहेत. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा बळी ठरत असताना शासन आणि प्रशासन दोन्ही स्तरावरील अनास्थेमुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे हाल होत आहेत. त्यामुळे एकंदरीतच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे महिन्यातुन २ वेळा बैठक आणि महिनाभरात आर्थिक मदत देण्याचे आश्वासन हवेतच विरल्याची प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

### बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांबाबत अहवाल

| महिना | एकुण प्रकरणे | पात्र | अपात्र | चौकशीसाठी | प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | २५ | १९ | १६ | ०३ | ०० |
| फेब्रुवारी | २५ | २० | ०४ | ०१ | ०० |
| मार्च | २५ | २७ | २३ | ०४ | ०० |
| एप्रिल | २५ | २१ | १५ | ०५ | ०१ |
| मे | २५ | १४ | ११ | ०१ | ०२ |
| जुन | २५ | २० | ०८ | ०२ | १० |
| ४ जुलै | २५ | ०० | ०० | ०४ | |

एकुण १ जानेवारी २०२५ ते ४ जुलै २०२५ दरम्यान १८५ दिवसांत १३० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यापैकी ९३ प्रकरणे पात्र ठरली असुन १९ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली असुन विशेष म्हणजे आजही १८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. या कालावधीत ८४ लाख रुपयांची मदत देण्यात आली असुन सन २०२५ मधील १८ शेतकरी आत्महत्या प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असुन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे तहसीलदार (महसूल–१) जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांनी विभागीय आयुक्तांना शेतकरी आत्महत्या बाबत अहवाल सादर केला आहे.

# ज्येष्ठ नेते डॉ.बाबुराव जोगदंड यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरा



बीड । प्रतिनिधी

बालाघाट आणि बीड जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते डॉ.बाबुरावजी जोगदंड यांचा वाढदिवस अनेक सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. डॉ. बाबुराव जोगदंड यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील अनेक सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करण्यात आला.

या वाढदिवसानिमित्त जिव्हाळा अनाथ आश्रम भाजी मंडई बीड या ठिकाणी कार्यकर्त्यांकडून व्यर्थ खर्चाला बाजूला सारत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शेकडो कार्यकर्त्यांनी रक्तदान देत वाढदिवस साजरा केला तसेच सायंकाळी जिव्हाळा बेघर निवारा केंद्र या ठिकाणी अनाथ लोकांसाठी अन्नदान करून वाढदिवस साजरा करण्यात आला. डॉ.जोगदंड हे सातत्याने सामाजिक कार्यात असून गोर गरीब लोकांना कायमच मदतीचा हात देत असतात. त्यांच्या याच सामाजिक कार्याच्या मार्गावर चालत त्यांच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक उपक्रम राबवून डॉ.बाबुरावजी जोगदंड यांचा वाढदिवस साजरा केला.

मांजरसुंबा ससेवाडी ग्रामपंचायत सदस्य संदीप कदम, ज्येष्ठ नेते अच्युतराव रसाळ, राहुल कदम, संदीपान कदम, शिवानी चे माजी सरपंच रवी मुंजाळ, महाजनवाडी चे विलास घरत, विशाल शिंदे, बिभीषण डोईफोडे यांच्यासह अनेक शेकडो कार्यकर्त्यांनी या वाढदिवसानिमित्त रक्तदान केले. यावेळी माजी सरपंच बबन वाघमारे, संपादक समीर काझी, संपादक नितीन जोगदंड, जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, अभिजीत वैद्य, छाया सरवदे उपस्थित होते.



मिलिया सीनियर कॉलेजचे प्रोफेसर डॉक्टर कलीम खतीब सर हे सेवानिवृत्त झाल्याबद्दल आज त्यांचा सत्कार करताना समाजसेवक मुसाखान पठाण, फिरोज खान पठाण. मोमीन शाफे व इफ्तेखार खान दिसत आहेत.

# अमृत अटल जल योजना अंतर्गत झालेल्या पाईपलाईनला पाणी कधी येणार? : शेख युनूस

बीड । प्रतिनिधी

जल योजना अंतर्गत बीड शहरात काही ठिकाणी फक्त पाईपलाईन टाकून कनेक्शन पण देण्यात आलेली आहे. तीन ते चार वर्षे झाले तरी तेलगाव नाका, पटेल नगर, कुबा कॉलनी या ठिकाणची मुख्य पाईपलाईन जोडायची राहिलेली आहे. या संदर्भात मी नगरपरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंधारे मॅडम यांना निवेदन दिलेले आहे तरी अजून पाईपलाईन जोडण्यात आलेली नाही. शहरात राहून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी दारोदारी जावे लागत आहे. यासाठी नगरपरिषद प्रशासन, गुत्तेदार व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा हलगर्जीपणा जबाबदार आहे .तरी मुख्य कार्यकारी अधिकारी नीताताई अंधारे मॅडम आपण स्वत: येऊन पाहणी करावी व पाईपलाईन जोडून द्यावी हीच नागरिकाकडून अपेक्षा आहे.



# कालिकादेवी माध्यमिक विद्यालयात 'गुरूपौर्णिमा' उत्साहात साजरी

शिरूर (का.) । प्रतिनिधी

दि.१० जुलै २०२५ गुरूवार रोजी, शिरूर (कासार) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक विद्यालयात,'गुरूपौर्णिमा' उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य केशव भांगे यांच्या हस्ते,'आदर्श शिक्षण संस्थेच्या संस्थापिका लोकनेत्या स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर व लोकनेते स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्रपणे गुरूवंदन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी आपल्या भाषणातून, 'गुरूपौर्णिमा' हा दिवस भारतीय परंपरेतील विशेष मानला जातो. या दिवशी आपण निवडलेल्या गुरूजनांचा अथवा शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी ही गुरूपौर्णिमा साजरी केली जाते, गुरू म्हणजे ज्ञानाचा उगम व अखंड वाहणारा झरा, गुरू म्हणजे निष्ठा, कर्तव्य आणि गुरू म्हणजे निस्सीम श्रध्दा,



भक्ती, आदर्शाचे मूर्तिमंत प्रतिक होय, असे गुरूंचे महात्मे आपल्या मनोगतातून वर्णन केले. चि.शोयब आतार, या विद्यार्थ्यानेही मनोगतातून गुरूजनांबद्दल कृतज्ञपूर्वक भावना व्यक्त केल्या. तर कु.पुजा काळे, आकांक्षा खेडकर, चि.समर्थ दुधाळ, आशय बडे या विद्यार्थ्यांनी गुरूवर्यांना गुलाबाचे फुल देऊन वंदन केले.

यावेळी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने, उपमुख्याद्यापक प्रकाश राठोड, पर्यवेक्षक जनार्दन काळे, प्रा.महारूद्र डोंगरे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.नारायण घोलप, प्रा.अशोक इनकर, प्रा.संजय काकडे, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.अनिल जरे, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.महादेव हांगे, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.नारायण तांबे, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, प्रा.दत्ता शिंदे, डॉ.आत्माराम झिंजुर्डे, डॉ.सत्यनारायण ढवळे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.अशोक सवासे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.शशिकांत जावळे, प्रा.हनुमंत घायाळ, डॉ.अशोक घोडके, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.अमर खोले, प्रा.अक्षय रणखांब, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे मॅडम, आबासाहेब ढवळे, रविंद्र बडे, बाळासाहेब येवले, वसंत आहेर, राजू बडे, आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर, रोहित शिराळे, प्रशांत राऊत, रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, अक्षय साळवे, जितेश उगलमुगले, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, विलास कांबळे, गौतम भोसले इत्यादिंची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन जयेंद्र निकम यांनी केले. विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखिल भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघाच्या जिल्हा सरचिटणीस पदी बालाजी जगतकर च्या निवडीबद्दल सत्कार



परळी । प्रतिनिधी

अखिल भारतीय लघु व मध्यम वृत्तपत्र संघाचे मराठवाडा अध्यक्ष आत्मलिंग शेटे यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील कार्यकारणीत बालाजी जगतकर यांची सरचिटणीसपदी निवड केली आहे. देशपातळीवर व राज्यपातळीवर प्रकारासाठी ही संघटना काम करते. बीड जिल्ह्यात बालाजी जगतकर हे अनेक वर्षापासून पत्रकार व संपादक म्हणून काम करत आहेत. जिल्ह्यात संघटन अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने ही निवड गुरुपौर्णिमेच्या दिवशी करण्यात आली आहे.

उर्वरित जिल्हाकारणी आठवड्यात लवकरच बैठक येणार असल्याची माहिती आत्मलिंग शेटे यांनी सतरा वेळी बोलताना सांगितले आहे. या निवडीच्या सत्काराला संपादक मोहन वावळे, संतोष जुजगर, अनिल गायकवाड, राज जगतकर रावसाहेब आदी उपस्थित होते.

# आखिल भारतीय विद्यार्थी परिषद बीड शाखेकडून राष्ट्रीय विद्यार्थी दिन व गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

## गुरुपौर्णिमा आणि राष्ट्रीय विद्यार्थी दिन... संस्कारांचा संगम!

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, बीड शाखेच्या वतीने ९ जुलै राष्ट्रीय विद्यार्थी दिन आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा ७७ वा. स्थापना दिन मोठ्या बीड जिल्हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शहरातील विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शुभेच्छा कार्ड देऊन राष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच शासकीय खढख महाविद्यालयात कौशल्य विकासातील संधी व उद्योजकता विकास या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते प्रा.डॉ. रमेश खंडागळे होते. यांनी सांगितले की आज चा विद्यार्थी हा कौशल्य पूर्ण असावा व तो नोकरी च्या मागे न पळता उद्योजक बनण्याच्या पर्यंत



करणारा असावा. असे सांगत उद्योजकता विषयाचे महत्व व येणाऱ्या संधी सांगितल्या.

अभाविप स्थापना दिन आणि राष्ट्रीय विद्यार्थी दिनानिमित्त बंकट स्वामी महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमात प्राचार्य शंकर धांडे व अभाविप स्थायी कार्यकर्ते चंद्रकांत फड यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. या वेळी अभाविप प्रांत डञऊ प्रमुख प्रा. डॉ. अरुण पाटील, शहराध्यक्ष प्रा.डॉ. जगन्नाथ चव्हाण, शहर सहमंत्री आशिष वारे, राघवेंद्र कुलकर्णी, प्रद्युमन परजणे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

तसेच बीड शहरातील विविध महाविद्यालयात जाऊन प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकवृंदांना भेटून गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यात आल्या. शहर सहमंत्री आशिष वारे, राघवेंद्र कुलकर्णी, प्रद्युमन परजणे, आशुतोष रणखांबे, ऋषिकेश लाखे, सार्थक कडु व इतर कार्यकर्ते सहभागी झाले होते. अभाविप बीड शाखेकडून घेतलेल्या या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थी आणि शिक्षकवर्गात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून भविष्यात असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील असे शहर सहमंत्री आशिष वारे यांनी सांगितले.

# श्री क्षेत्र भगवानगड येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

भगवानगड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र भगवानगड येथे हजारो भाविकांच्या उपस्थितीमध्ये गुरुपौर्णिमेनिमित्त पारंपारिक पद्धतीने गुरुपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. दरवर्षी आषाढी एकादशीनिमीत्त पंढरपूरला गेलेली भगवानगडाची पालखी गडावर पोहोचल्यानंतर गुरुपौर्णिमेच्या दिवशी काला केला जातो. गडाचे मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूरवरून श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीसोबत परतलेले वारकरी तसेच भगवानगडाचा भक्तवर्ग यांच्या उपस्थितीत हा काल्याचा सोहळा साजरा करण्यात आला.

योगायोगाने पालखीच्या काल्याच्या दिवशी गुरुपौर्णिमा येत असल्याने हा एक दुग्धशर्करा योग बनतो. सदरील कार्यक्रम साजरा करताना ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांच्या मार्गदर्शनाखाली गडावरील प्रधान आचार्य ह.भ.प.श्री.नारायण महाराज



शास्त्री (स्वामीजी) व भगवानगडाचे चौथे उत्तराधिकारी ह.भ.प. श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांनी गडावरील विजयी श्री.पांडुरंगाचा अभिषेक करून वै.गुरुवर्य श्री संत भगवानबाबा, वै.गुरुवर्य श्री संत भीमसिंह महाराज यांच्या समाधीचा अभिषेक व महापूजा केली. त्यांनतर सर्व भाविकांनी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांना पुष्पहार घालून आपल्या श्रीगुरुंचे यथोचित गुरुपूजन केले. श्रीगुरुंचे पूजन करण्यासाठी ह.भ.प.महंत श्री.विवेकानंद महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.नवनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.हनुमंत महाराज शास्त्री, ह.भ.प.महंत श्री.अतुल महाराज शास्त्री यांच्यासह गडाचे शेकडो साधक व हजारो भाविकांची उपस्थिती होती. उपस्थित हजारो भाविकांना मान (ता. मान जि. सातारा) ग्रामस्थांनी स्वादिष्ट व रुचकर महाप्रसादाची पंगत दिली. दिवसभर श्रीगुरुंच्या दर्शनासाठी भाविकांची रीघ सुरूच होती.

# पंडित -पवार एकत्र आल्याने उंचावल्या अनेकांच्या भुवया!

## गेवराई तालुक्यात नव्या राजकीय समीकरणांचा 'उदय'



गेवराई । प्रतिनिधी

राजकारणात कुणीच कुणाचा कायम मित्र किंवा शत्रू नसतो. कुठल्याही निवडणुकीतील मतमोजणी संपल्यानंतर अनेक नेते एकत्र येतात व हे आणि अधिकच दृढ झाले त्यामुळेच आत्ताच झालेल्या विधानसभेच्या निवडणूक निकालानंतर माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे बंधू बाळराजे पवार व माजी मंत्री बदामराव पंडित यांची गेवराई तहसील कार्यालयाच्या परिसरात दि.१०जुलै रोजी सुरू असलेल्या सय्यद एजाज यांच्या उपोषणाच्या निमित्ताने एकत्र येणे राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. या भेटीने अनेक तर्कवितर्क लावले जात असल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

गेवराईच्या राजकारणात पंडित विरुद्ध पवार असा राजकीय फड नेहमीच रंगतदार ठरला आहे पण् आता झालेल्या २०२४विधानसभेच्या निवडणुकीत विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी जोरदार मुसंडी मारल्याने समोरील उमेदवारांना हादरा देणारी ही निवडणूक ठरल्याने विद्यमान आमदार यांच्या माध्यमातून गेवराई शहरात विकास कामाचा धुमधडाका लावला तसेच माजी मंत्री शिवसेना नेते बदामराव पंडित यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांना नेहमी क्रमांक एकचा विरोधक म्हणून बघितले आहे. अस अनेकदा आपली भूमिका जगजाहिर केली होती. गेवराईत पवार-पंडीत यांचे एकत्र येणे अनेकांच्या भुवया उंचावणारे ठरेल का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. उपोषणाच्या अनुषंगाने दोन्ही नेते एकत्र आले असले तरी या भेटीतून राजकीय शक्यता वास्तवात येण्याची शक्यताही नाकारता येण्यासारखी नाही.माजी मंत्री बदामराव पंडित यांना गेवराई तालुक्यातून दोन वेळा तीन वेळा होण्याची संधी मिळाली. दोन्ही ठाकरे ब्रँड नेते राज्यात मराठी माणसाच्या हितासाठी एकत्र आले आहेत, हि वस्तूस्थिती आहे.

आता राज्यात बदललेल्या राजकीय वातावरणात शिवसेना ठाकरे गटांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला सोबत घेतलें याबाबत शंका येण्याचे कारण नाहींच तसेच येणाऱ्या काळात बदामराव पंडित यांना सोबत घेवून आणखी एक धक्का तर माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे बंधू बाळराजे पवार राजकीय वर्तुळाला देणार नाहीत ना, अशी चर्चाही रंगू लागली आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.



## पेठ बीड पोलीसांची कामगिरी, दारू पकडली



बीड । प्रतिनिधी


पोलीस स्टेशन पेठ बीड गुरनं. १९१/२०२५ कलम ६५ (ई) म.दा. का. प्रमाणे छापा टाकुन केला ७१००० /- रुपयेचा मुद्देमाल जप्त केला. दिनांक १०/०७/२०२५ रोजी पोलीस ठाणे पेठ बीड येथे फिर्यादी नामे विष्णु भागवत गुजर वय ३२ वर्ष व्यवसाय नौकरी पोशि/२२१८ नेमणुक पोलीस स्टेशन पेठ बीड यांनी फिर्यादी दिली की, गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, अलकबीर हॉल समोर पेठ बीड येथे इसम नामे अक्षय गणेश वाणी वय २५ वर्ष रा शिवनेरी कॉलनी ईमानपुर पेठ बीड हा. त्याचे ताब्यातील ईलेक्ट्रीक स्कुटी वर विना परवाना बेकायदेशीर प्रो गुन्ह्याचा माल विक्री साठी घेवुन जात असल्याची माहीती मिळाले वरुन त्यांनी सदर माहीती पोलीस निरीक्षक, आशोक मुदिराज यांना देवुन पोलीस ठाणे पेठ बीड येथील सपोनि. श्री. नित्यानंद उबाळे, पोह/ ५५९ हनुमंत उगले, पोना/१८३५ शिकेतोड, पोशि/२२१८ गुजर, पोशि/१५५१ परजणे यांना सोबत घेवुन मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी छापा मारला असता १) देशी दारू बॉबी संत्रा कंपणीच्या ६०० सिलबंद बाटल्या किंमती २१०००/- रुपये २) एन. के. कंपनीची ईलेक्ट्रीक स्कुटी किंमत ५००००/- असा ७१०००/- रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या बाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक, श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री. कमलेश मीना यांना माहीती देवुन मा. वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कार्यवाही केली असुन पुढील तपास पोह/१५०८ अनिल भालेराव हे करीत आहेत.

## विशाल सराफ यांच्या मागणीला यश, लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

### किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर बसणार कॅमेरे परिसरात पथदिवे व स्वच्छता होणार

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरात ऐतिहासिक किल्ला आहे पुरातत्त्व विभागाच्या दुर्लक्षामुळे या किल्ल्याची दैना झाली आहे. यामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे ही होणारी गैरसोय टाळण्यासाठी विविध मागण्या घेऊन विशाल सराफ यांनी दि.१० जुलै रोजी धारू तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. या उपोषणाची तहसील व नगरपरिषद प्रशासनाने दखल घेऊन विशाल सराफ यांना त्यांच्या मागण्या मान्य केल्या असून लेखी स्वरूपात मागण्या मान्य करण्याचे पत्र दिल्यानंतर विशाल सराफ यांच्याकडून उपोषण मागे घेण्यात आले आहे.



यावेळी स्वतः नायब तहसीलदार नजीर खुरेशी व मुख्याधिकारी महेश गायकवाड सह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

धारूर शहराच्या पश्चिमेस ऐतिहासिक किल्ला आहे. मागच्या काळात या किल्ल्याच्या पडझड झालेल्या बांधकामासाठी नधी आला होता. या निधीतून काही प्रमाणात बांधकाम झालेले आहे. त्यामुळे काही प्रमाणात या किल्ल्याची शोभा वाढलेली आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यटक हा किल्ला पाहण्यासाठी येण्याचा योग सुरू झाला असला तरी मागील एक ते दोन वर्षांमध्ये पुन्हा हा ऐतिहासिक किल्ला पुरातत्त्व विभागाकडुन दुर्लक्षित होताना दिसून येत आहे. सध्या या किल्ल्यात संरक्षक नसल्याने या ठिकाणी काही गैरप्रकार घडत आहेत. त्यामुळे महादुर्ग किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे, या रस्त्यावर झालेले अतिक्रमण काढण्यात यावे, किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेने पथदिवे बसविण्यात यावे तसेच या भागात चांगल्या प्रकारे सुशोभीकरण करण्यात यावे या मागण्या घेऊन विशाल सराफ यांच्याकडून तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले होते.

या उपोषणास बालाजी चव्हाण, सुरेश शेळके, सुनील कावळे, विश्वास शिनगारे आदींनी भेट देऊन उपोषण करते व प्रशासन यांच्यात मध्यस्थी करून विशाल सराफ यांच्या मागणीप्रमाणे मागण्या मान्य करण्यात प्रशासनाने सहमती दर्शवली आहे आणि तशा प्रकारचे लेखी पत्र उपोषणकर्ते विशाल सराफ यांना देण्यात आले आहे. यावेळी स्वतः नायब तहसीलदार नजीर कुरेशी, मुख्याधिकारी महेश गायकवाड यांनी या उपोषण स्थळी भेट देऊन उपोषण सोडवले. यावेळी रोहित फावडे, सतीश गायकवाड हनुमान तोंडेसह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मानवी हक्क अभियान आयोजित गायरान धारकांच्या इशारा मोर्चात सामील व्हा : अक्षय गवळी

माजलगाव । प्रतिनिधी

गायरानधारकांसह मागासवर्गीय समाजाच्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी मानवी हक्क अभियान च्या वतीने सोमवार (दि. १४) रोजी माजलगाव येथील उपविभागीय कार्यालयावर मोर्चा धडकणार आहे.



मानवी हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद नाना आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या मोर्चाच्या आयोजन करण्यात आले असून याप्रसंगी माजलगाव तालुक्यातील जनतेने बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निमंत्रक अक्षय गवळी यांनी केले आहे.

सन १९७८ ते १९९० या कालावधीमधील गायरान जमिनीचे प्रलंबित प्रकरणे २८ नोव्हेंबर १९९१ च्या शासन निर्णयानुसार नियमित करावेत. ताब्यात असणाऱ्या गायरान जमिनी मधील पिक पंचनामे करून ई- रजिस्टर ला नोंदी घेण्यात याव्यात. आर्टी व बार्टी या संस्थांना ठोस व भक्कम निधी देऊन शिक्षण, संशोधन व कौशल्य विकासासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व निधी उपलब्ध करावा, अण्णाभाऊ साठे महामंडळ, संत रोहिदास महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, मौलाना अब्दुल कलाम महामंडळ या सर्व महामंडळांना भरीव निधी उपलब्ध करावा व कर्जवाटप तात्काळ करण्यात यावेत, राज्यातील अनुसूचित जातीच्या आरक्षण मध्ये अ, ब, क,ड अशी वर्गवारी करून ते तातडीने लागू करावेत, वडवणी तालुक्यातील मौजे साळींबा व उपळी या गावांसह जिल्हाभरातील वहिती असलेल्या गायरान जमिनीवर होणारे शासनाचे प्रकल्प रोखण्यात यावेत, पंतप्रधान घरकुल योजना व रमाई घरकुल योजनेचे अर्थसहाय्य पाच लाख रुपये प्रति घरकुल करण्यात यावे, प्रत्येक गावात दलितांसाठी मजबूत स्मशानभूमी बांधून देण्यात यावी, शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय मुलांना शिष्यवृत्ती वाढ करून ती वेळेवर वाटप करण्यात यावे, अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी, सन १९८९ सालच्या गोदावरी नदीतील पूरग्रस्तांना पूरग्रस्त प्रमाणपत्र देण्यात यावे आदी मागण्यासाठी १४ जुलै रोजी माजलगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते उपविभागीय कार्यालय दरम्यान भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रा.डॉ. मिलिंद नाना आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हाध्यक्ष राजेश क्षीरसागर हे मोर्चाचे नेतृत्व करत आहेत. माजलगाव तालुका अध्यक्ष मधुकर कांबळे, वडवणी तालुका अध्यक्ष विष्णू मुजमुले गेवराई तालुका अध्यक्ष धोंडीबा आढागळे यांच्यासह जिल्ह्यातील बहुसंख्य मानवी हक्क अभियान चे पदाधिकारी यांच्या नेतृत्वात या मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून माजलगाव तालुक्यातील गायरान धारक शेतकरी, मागासवर्गीय जनतेने या मोर्चात सामील होण्याची आवाहन निमंत्रक मानवी अभियानचे युवा कार्यकर्ते अक्षय गवळी यांनी माध्यमांद्वारे केले आहे.

## विकासकामांचा गावनिहाय अहवाल तत्काळ सादर करा : गोरक्ष लोखंडे

### राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या सदस्यांकडून आढावा

बीड । प्रतिनिधी

दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, जलजीवन मिशन योजनेंतर्गतचे उद्दिष्ट, प्राप्त व खर्च झालेला निधी, पूर्ण झालेली कामे, प्रगती पथावर असलेल्या कामांचा गावनिहाय परिपूर्ण अहवाल राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगास तत्काळ सादर करावा, अशा सूचना राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी सबंधित अधिकाऱ्यांना केल्या.

दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, जलजीवन मिशन योजनेंतर्गत राबविण्यात येणा-या विविध विकासकामांचा आढावा जिल्हा परिषदेच्या बैठक सभागृहात श्री. लोखंडे यांनी घेतला. या बैठकीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा जात पडताळणी विभागाच्या सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी श्रावस्ती मेश्राम, संबधित तालुक्यातील विस्तार अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

विविध योजनेंतर्गत करण्यात येत असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत. प्रलंबित कामांचा स्वयंस्पष्ट कारणांसह अहवाल सादर करावा, अशा सूचनाही श्री. लोखंडे यांनी अधिकाऱ्यांना बैठकीत केल्या. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सोळंके यांनी कार्यान्वित विविध योजनांचा सविस्तर तपशील यावेळी सादर केला.



## सामाजिक लोकोपयोगी कार्यक्रम सेवा संकल्प सप्ताहाचे आयोजन

### सेवा संकल्प सप्ताह १५ जुलै ते २२ जुलै २०२५

परळी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित पवार व आपले लाडके नेते माजी मंत्री आ.धनंजय मुंडे या दोन दिग्गज नेत्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी १५ जुलै ते २२ जुलै दरम्यान युवकनेते अजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक लोकोपयोगी कार्यक्रम सेवा संकल्प सप्ताह चे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आले असून लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर प्रांगणमध्ये सेवा 'संकल्प सप्ताह' आयोजित होणार असून अबालवृद्धानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे!



सेवा संकल्प सप्ताहमध्ये योगासन स्पर्धा, मृदंग वादन स्पर्धा, भावरत्न गुरुदास ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांचे कीर्तन, महिलांसाठी भजन स्पर्धा शहर व ग्रामीण भागातील शाळांसाठी शालेय सांस्कृतिक स्पर्धा महोत्सव, सामाजिक संदेश देणारी 'रील्स स्पर्धा', आरोग्य शिबीर, सामान्य ज्ञान स्पर्धा, परळी मतदार संघातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप प्रा.महेश पाटील सर यांचे शैक्षणिक मार्गदर्शन होणार आहे. दिनांक १५ ते २२ जुलै दररोज संजय गांधी निराधार योजनेचे आधार सिडींग व घधउ, रेशन कार्ड ऑनलाईन करणे, शेतकरी कार्ड साठी उ्ढढ योजनेचे शिबीर, विद्यार्थ्यांना लागणारे आवश्यक प्रमाणपत्र काढून देणे, बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र शिबीर, घरकुल योजना सबंधी सहाय्यता कक्ष, आधार कार्ड दाखवा आणि वृक्ष घेवून जा! दररोज रक्तदाब व मधुमेह तपासणी शिबीर यांसह अनेक उपक्रम आयोजित केले असून सर्वांनी या संधीचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा ही विनंती करण्यात आली आहे.

## ना. पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळीत वृक्ष लागवड पंधरवडा

### ११ ते २६ जूलै दरम्यान भाजपच्या वतीने शहरात मोठ्या प्रमाणात होणार वृक्षारोपण



परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात भाजपच्या वतीने ११ ते २६ जूलै दरम्यान वृक्ष लागवड पंधरवडा साजरा होत असून या कालावधीत विविध भागात मोठया प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येणार आहे. पर्यावरणाच्या या मोहिमेत भाजपच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सहभागी होऊन जास्तीत जास्त वृक्ष लागवड करावी असे आवाहन शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टे यांनी केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'एक पेड मॉ के नाम' या अभियानांतर्गत पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या आवाहनानुसार त्यांच्या २६ जूलै रोजी येत असलेल्या वाढदिवसाच्या अनुषंगाने भाजपतर्फे हा वृक्ष लागवड पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने विविध जातींच्या वृक्षांची रोपे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

उद्या सकाळी ११ वा. कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्ष लागवड पंधरवडा मोहिमेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. उद्यापासून ते थेट २६ जूलै पर्यंत शहरातील विविध ठिकाणी सरकारी व खासगी जागेवर वृक्षारोपण करण्यात येईल. भाजपचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच पर्यावरण प्रेमी नागरिकांनी जास्तीत जास्त वृक्ष लागवड करण्यासाठी या मोहिमेत सहभागी व्हावे आणि आपली परळी ग्रीन सिटी करावी असे आवाहन शहराध्यक्षा समशेट्टे यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT